अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 09 जुलै 2026 | वर्ष 11 वे | अंक 48 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# ब्रम्हपुरीत 'FISCPCON 26' राष्ट्रीय परिषद यशस्वी

## डॉ. लक्ष्मीकांत लाडूकर यांच्या भगीरथ प्रयत्नांमुळे ब्रम्हपुरीचे नाव वैद्यकीय नकाशावर

### ३५ रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया

ब्रम्हपुरी/का.प्र.

वैद्यकीय क्षेत्राचे बाजारीकरण होत असल्याच्या आजच्या काळात, लाडुकर सर्जिकल हॉस्पिटलने सामाजिक बांधिलकीचा एक आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे. निमित्त होते आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या 'इंटरनॅशनल सोसायटी ऑफ कोलोप्रोक्टोलॉजी' (ISCP), असोसिएशन ऑफ सर्जन्स नागपूर (ASN) आणि आय.एम.ए. ब्रम्हपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'FISCPCON 26' या राष्ट्रीय कार्यशाळा व परिषदेचे. या




ऐतिहासिक सोहळ्याचा भव्य उद्घाटन समारंभ नुकताच येथील 'कृष्णा सेलिब्रेशन हॉल' येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

ब्रम्हपुरीसारख्या शहरी भागात आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील एवढी मोठी वैज्ञानिक परिषद यशस्वीपणे आयोजित करण्याचे शिवधनुष्य डॉ. लक्ष्मीकांत लाडुकर यांनी पेलले. संपूर्ण देशातून आलेल्या जवळपास १०० दिग्गज शल्यविशारदांना (सर्जन्स) एकाच छताखाली आणणे आणि ५३ नवोदित डॉक्टरांना उच्च दर्जाचे वैद्यकीय प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे, ही डॉ. लाडुकर यांच्या दूरदृष्टीची आणि कौशल्याची प्रचिती आहे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. लाडुकर यांनी राष्ट्रीय 'ISCP' फॅकल्टीचा सत्कार करून सर्व पाहुण्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. तसेच, दोन दिवसांत पार पडलेल्या ३५ मोफत शस्त्रक्रिया आणि ५३ नागरिक शल्यचिकित्सकांना देण्यात आलेल्या आधुनिक ज्ञानाची रूपरेषा मांडली. त्यांच्या या भगीरथ प्रयत्नांमुळे ब्रम्हपुरीचे नाव देशाच्या वैद्यकीय नकाशावर ठळकपणे कोरले गेले आहे.

आजच्या काळात शस्त्रक्रियांचा खर्च सामान्यांच्या आवाक्याबाहेर जात असताना, लाडुकर सर्जिकल हॉस्पिटलमध्ये तब्बल ३५ गरजू रुग्णांवर संपूर्ण मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या. केवळ व्यावसायिकता न जपता, समाजातील शेवटच्या घटकाला आधुनिक वैद्यकीय उपचार मिळवून देण्याचे हे कार्य म्हणजे डॉ. लाडुकर यांच्या संवेदनशील मनाची साक्ष आहे.

नागपूरचे सुप्रसिद्ध सर्जन व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुब्रजीत दासगुप्ता यांनी आपल्या खुसखुशीत पण मार्मिक शैलीत आजच्या वैद्यकीय शिक्षणाच्या बाजारीकरणावर आणि शासनाच्या भूमिकेवर यथार्थ भाष्य केले. वैद्यकीय व्यवसायाच्या आधुनिकीकरणाचे स्वागत करतानाच त्यांनी डॉक्टरांनी नीतिमूल्ये आणि मूल्यशिक्षण जपण्याचे आवाहन केले व या

(उर्वरित पान क्र. ५ वर)

# विधानसभेत ब्रम्हपुरी जिल्हा मागणीचा आवाज बुलंद

## आम. वडेट्टीवारांकडून जिल्ह्याचा मुद्दा उपस्थित

ब्रम्हपुरी/का.प्र.

विधानसभेत काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील विविध गंभीर प्रश्न उपस्थित करत सरकारला जाब विचारला. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, मुंबई महापालिकेच्या आर्थिक स्थितीपासून ते मुद्रांक शुल्क घोटाळा, स्मार्ट मीटर, शासकीय जमिनींची लूट, योजनेतील कथित अनियमितता अशा अनेक विषयांवर सरकारला धारेवर धरले. विधानसभेत विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर भाषण करताना वडेट्टीवार म्हणाले की, ब्रह्मपुरीला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा देण्याबाबत सकारात्मक प्रस्ताव आले आहेत, त्यामुळे जिल्हा निर्मितीचा प्रस्ताव



आल्यास त्यावेळी ब्रह्मपुरीचा सकारात्मक विचार करावा अशी मागणी त्यांनी केली.

ऑस्ट्रेलियातील सिडनी विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विभागाच्या शिष्यवृत्तीधारक मृण्मय जाधव या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती मंजूर असूनही फी आणि लिव्हिंग अलाउन्स न मिळाल्याने त्याच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. त्याची मानसिक स्थिती ढासळली आहे, असे वडेट्टीवार यांनी सभागृहात सांगितले. या विद्यार्थ्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. सरकारने तातडीने मंजूर शिष्यवृत्तीची रक्कम वितरित करावी, अशी मागणी त्यांनी केली.

एकीकडे सरकार सांगते की स्मार्ट मीटर ही जबरदस्ती बसवण्यात येणार नाही. पण अनेक ठिकाणी जबरदस्ती मीटर बसवण्यात आले. त्यानंतर वीजबिले प्रचंड वाढल्याच्या तक्रारी राज्यभरातून येत आहेत. वाढलेल्या बिलांमुळे जनता त्रस्त आहे, सरकारने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी त्यांनी केली.

मुंबई महापालिकेच्या मुदतठेवींमध्ये एका वर्षात सुमारे ४ हजार कोटी रुपयांची घट झाल्याचा मुद्दा उपस्थित करत हा पैसा नेमका कुठे खर्च झाला? मुंबईत पहिल्याच पावसात अनेक मृत्यू, मॅनहोल दुर्घटना, झाडे पडण्याच्या घटना घडत असताना एवढा निधी खर्च होऊनही नागरिकांना सुविधा का मिळत नाहीत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.




जल है तो कल है...

संपादकीय...

# सरकार मान्य 'टक्केवारी'?

भारतीय लोकशाहीची खरी ताकद संसद किंवा विधानसभेत नसते; ती ग्रामपंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या दैनंदिन कारभारात असते. नागरिकाचा शासनाशी सर्वाधिक संबंध याच संस्थांमधून येतो. पिण्याचे पाणी, रस्ते, गटारे, कचरा व्यवस्थापन, उद्याने, आरोग्य आणि नागरी सुविधा या सर्व सेवा स्थानिक स्वराज्य संस्थाच पुरवतात. त्यामुळे या संस्थांमधील पारदर्शकता म्हणजे लोकशाहीच्या गुणवत्तेचा आरसा होय. दुर्दैवाने हा आरसा दिवसेंदिवस मलिन होत चालल्याची भावना जनमानसात दृढ होत आहे. भ्रष्टाचार झाला पाहिजे, पण टक्केवारी कमी हवी, हे एका स्थानिक लोकप्रतिनिधीच्या तोंडून सार्वजनिकपणे उच्चारले गेलेले वाक्य केवळ राजकीय वादाचा विषय नाही; ते आपल्या स्थानिक स्वराज्य व्यवस्थेच्या मानसिकतेवर बोट ठेवणारे आहे. भ्रष्टाचार हा अपवाद नसून व्यवस्थेचा अपरिहार्य भाग आहे आणि वाद केवळ त्याच्या प्रमाणाचा आहे, अशी धोकादायक स्वीकारार्हता या एका वाक्यातून व्यक्त होते. लोकशाहीसाठी ही केवळ लज्जास्पद बाब नाही, तर इशाराही आहे.

आज अनेक नागरिकांच्या मनात एक कटू समज तयार झाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे लोकप्रतिनिधी, कंत्राटदार आणि प्रशासन यांच्या संगनमतातून चालणारी आर्थिक साखळी. हा निष्कर्ष केवळ विरोधकांच्या आरोपांवर आधारित नाही. निकृष्ट दर्जाची सार्वजनिक कामे, त्याच रस्त्यांचे वारंवार होणारे खोदकाम, पावसाळ्यापूर्वी नाल्यांच्या साफसफाईचे पुनरावृत्तीने होणारे कंत्राट, वाढत्या खर्चानंतरही न सुधारणाऱ्या नागरी सुविधा या वास्तवामुळे नागरिकांचा संशय अधिक गडद होत आहे. यामागील मूळ प्रश्न म्हणजे विकासकामांच्या प्राधान्यक्रमावर लोकहितापेक्षा 'टक्केवारी'चे गणित प्रभावी ठरत असल्याची निर्माण झालेली धारणा. एखादे काम मंजूर होण्यापूर्वीच कमिशनच्या चर्चांना ऊत येतो, अशी परिस्थिती लोकशाहीसाठी घातक आहे. विकासकामांची निवड नागरिकांच्या गरजांवर नव्हे, तर आर्थिक फायद्यावर अवलंबून राहिली, तर सार्वजनिक निधी विकासाचे साधन न राहता राजकीय अर्थकारणाचे माध्यम बनतो. त्यातून 'उच्च खर्च, निकृष्ट दर्जा' हे समीकरण जन्माला येते.

याच कारणामुळे अनेक शहरांतील सिमेंटचे रस्ते काही वर्षांत उखडतात, गटारे पुन्हा पुन्हा बांधली जातात आणि त्याच भागात वारंवार खोदकाम सुरू राहते. दोष केवळ कंत्राटदारांचा नाही; देखरेख, उत्तरदायित्व आणि लेखापरीक्षणातील त्रुटीही तितक्याच जबाबदार आहेत. सार्वजनिक पैशातून उभारलेल्या कामांचा दर्जा टिकविण्यापेक्षा नवी कामे मंजूर करण्याची घाई अधिक दिसते.राज्य सरकार भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाचे कितीही दावे करीत असले, तरी त्याची प्रचिती नागरिकांना आपल्या शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि सार्वजनिक कामांच्या गुणवत्तेतूनच येते. त्यामुळे स्थानिक संस्थांबाबतचा लोकांचा अनुभव हा सरकारच्या कार्यक्षमतेचा सर्वात महत्त्वाचा निर्देशक ठरतो.

सार्वजनिक कामांशी संबंधित सर्व माहिती-निविदा, अंदाजपत्रक, कंत्राटदाराचे नाव, मोजमाप पुस्तिका, देयके, पूर्णत्व प्रमाणपत्र, दोषदायित्व कालावधी आणि लेखापरीक्षण अहवाल ही नागरिकांना सहज उपलब्ध झाली पाहिजे. माहितीच्या अधिकाराचा अर्ज केल्याशिवाय नागरिकांना स्वत:च्या पैशाचा हिशेब मिळत नसेल, तर पारदर्शकतेचे दावे अपुरेच ठरतात. प्रत्येक सार्वजनिक मालमत्तेला स्वतंत्र ओळख क्रमांक देऊन तिच्यावर झालेला खर्च, दुरुस्तीचा इतिहास आणि संबंधित कंत्राटदाराची माहिती सार्वजनिक संकेतस्थळावर उपलब्ध करणे कठीण नाही. मोठ्या विकासकामांचे स्वतंत्र तृतीय पक्षाकडून तांत्रिक व आर्थिक लेखापरीक्षण बंधनकारक करणे, निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारांवर राज्यव्यापी बंदी घालणे आणि दोषी अधिकाऱ्यांनाही तितकीच जबाबदारी निश्चित करणे ही काळाची गरज आहे. करदाता नागरिक हा सरकारचा याचक नसून सार्वजनिक निधीचा मालक आहे. त्यामुळे सार्वजनिक पैशाचा प्रत्येक रुपया कुठे आणि कसा खर्च झाला, याचा हिशेब मागणे हा त्याचा घटनात्मक अधिकार आहे. या अधिकाराला उत्तर देणारी व्यवस्था उभारणे ही सरकारची जबाबदारी आहे.

# श्री बालाजी नागरी पतसंस्थेतर्फे वृक्षारोपण

## सहकार सप्ताहानिमित्य ब्रम्हपुरीत पर्यावरण रक्षणाचा जागर

ब्रम्हपुरी/का.प्र.

सहकार क्षेत्राने केवळ आर्थिक नाड्या बळकट न करता सामाजिक उत्तरदायित्वही




तितक्याच ताकदीने जपले पाहिजे, हाच संदेश देत ब्रम्हपुरी येथे सहकार सप्ताहाचे औचित्य साधून एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ब्रम्हपुरी आणि श्री बालाजी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, ब्रम्हपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक ने. ही. महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

या पर्यावरणपूरक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रथम नगराध्यक्ष तथा श्री बालाजी नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अशोक भैया होते. तर प्रमुख अतिथी म्हणून ब्रम्हपुरीचे सहा. निबंधक स्वप्नील बा. पाटील आणि सहकारी संस्थेचे सचिन धात्रक प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रवेळी संस्थेचे सर्व संचालक मंडळ आणि कर्मचारी वृंदानेही कार्यक्रमाला हजेरी लावली होती.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. केवळ वृक्षारोपण करून न थांबता, लावलेल्या प्रत्येक झाडाचे उत्तम संगोपन करणे ही आजच्या काळात प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. 'सहकार क्षेत्र हे केवळ आर्थिक व्यवहारांपुरते मर्यादित नसून, समाजाच्या शाश्वत विकासातही त्याचा मोठा वाटा आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या पर्यावरणपूरक उपक्रमांची सातत्याने गरज आहे,' असे प्रतिपादन यावेळी मान्यवरांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी श्री बालाजी नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळासह सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या उपक्रमाचे आणि पतसंस्थेच्या सामाजिक जाणीवेचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# बाजार समितीतील गुजरीतील रस्त्यांची दुरूस्ती करा

## भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा ब्रम्हपुरीची मागणी



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात भरणाऱ्या दैनंदिन गुजरीमध्ये पावसामुळे अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली असून नागरिक व दुकानदारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन गुजरी परिसरात मुरूम टाकून रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा, ब्रम्हपुरी शहरच्या वतीने बाजार समिती प्रशासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दैनंदिन गुजरीमध्ये दररोज हजारो नागरिक खरेदी-विक्रीसाठी येत असतात. मात्र सततच्या पावसामुळे संपूर्ण परिसर चिखलमय झाला असून नागरिक, शेतकरी व दुकानदारांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी पाणी साचल्याने अस्वच्छता वाढली असून अपघात होण्याची तसेच नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे बाजार समिती प्रशासनाने तातडीने गुजरी परिसरात मुरूम टाकून अंतर्गत रस्ते वाहतुकीस योग्य करावेत व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी भाजयुमोने केली आहे. प्रशासनाने या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा, ब्रम्हपुरी शहरच्या वतीने बाजार समिती प्रशासनाविरुद्ध तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदन देताना भाजयुमो शहर अध्यक्ष अमित रोकडे, महामंत्री पंकज माकोडे, उपाध्यक्ष बंटी येरावार, अक्षय झुरमुरे, भरत सावकार, सचिव केतन पेशने, कोषाध्यक्ष रोशन कावळे, गणेश जोगे, शुभम बोरसरे, जगदीश दोनाडकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## विनोदिनी

*कंपनी के सुंदर युवा बॉस ने अपनी सेक्रेटरी को बुलाया...*

*बॉस : आज शाम को तुम कुछ कर रही हो....??*

*सेक्रेटरी : (मनही मन खुश होते हुए) जी नहीं...*

*बॉस : शायद.... कहीं किसी के साथ तफरीह के लिए जाना हो....*

*सेक्रेटरी : जी नहीं... मैं तो बिलकुल खाली हूं.... आप बोलीए क्या काम है.... कहीं बाहर जाना है... क्या...???*

*बॉस : तो फिर आज घर जाकर जल्दी सो जाना... ताकि सुबह वक्त पर ऑफीस पहुंच सको.... रोज लेट होती हो...!!!*

# ब्रम्हपुरी आगाराच्या ताफ्यात ५ नवीन राजमाता जिजाऊ बस दाखल

## विधीमंडळ काँग्रेस नेते आम. विजय वडेट्टीवार यांच्या पाठपुराव्याला यश

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ब्रम्हपुरी आगाराच्या ताफ्यात 'राजमाता जिजाऊ' नावाच्या पाच नवीन बस दाखल झाल्या असून, त्यांचा लोकार्पण सोहळा नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे आमदार विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाल्याने ब्रम्हपुरी आगाराला या बस उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे परिसरातील हजारो प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी व दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळणार आहे.



ब्रम्हपुरी आगारात आयोजित लोकार्पण सोहळ्याप्रसंगी नगराध्यक्ष योगेश मिसार, नगरपरिषदेचे उपाध्यक्ष डॉ. नितीन उराडे, आरोग्य सभापती मनोज कावळे, नगरसेवक राकेश पडोळे, पुष्पाकर बांगरे, वकार खान, अविनाश राऊत, मनोज भूपाल, अमिताभ नागमोती, मुकुंदा राऊत, प्रभारी आगार व्यवस्थापक वासनिक तसेच वाहतूक निरीक्षक राजू पांडव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी नवीन बस उपलब्ध झाल्याबद्दल समाधान व्यक्त करत आमदार विजय वडेट्टीवार यांनी ब्रम्हपुरी आगाराच्या विकासासाठी सातत्याने केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी राज्य परिवहनची सेवा ही जीवनवाहिनी असून, नवीन बसमुळे आगाराची प्रवासी वाहतूक क्षमता वाढणार आहे. तसेच जुन्या बसवरील ताण कमी होऊन विविध मार्गांवरील बससेवा अधिक नियमित, कार्यक्षम व विश्वासार्ह होण्यास मदत होणार आहे.

ब्रम्हपुरी हे पूर्व विदर्भातील शिक्षण व आरोग्य क्षेत्राचे महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळखले जाते. चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा तसेच आसपासच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणासाठी आणि रुग्ण उपचारासाठी दररोज मोठ्या संख्येने ब्रम्हपुरीत ये-जा करतात. त्यामुळे ब्रम्हपुरी आगारातून विविध मार्गांवर मोठ्या प्रमाणात बसफेऱ्या सुरू असतात. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता आगारात अधिक बसांची आवश्यकता दीर्घकाळापासून व्यक्त केली जात होती. अशा परिस्थितीत नव्याने प्राप्त झालेल्या पाच 'राजमाता जिजाऊ' बस मुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून, बससेवा अधिक सक्षम व गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

कार्यक्रमास आगारातील अधिकारी, यांत्रिक विभागातील कर्मचारी, प्रशासकीय कर्मचारी, चालक, वाहक तसेच इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर नवीन बसांचे पूजन करून त्या विविध मार्गांवर प्रवासी सेवेसाठी रवाना करण्यात आल्या. ब्रम्हपुरीसह संपूर्ण परिसरातील नागरिकांनी नवीन बस उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले असून, वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता भविष्यात ब्रम्हपुरी आगाराला आणखी नवीन बस उपलब्ध करून देण्याची अपेक्षाही यावेळी व्यक्त केली आहे.

# स्व. किसनलालजी भैया फाऊंडेशनतर्फे १९० विद्यार्थीनींना गणवेश वितरण

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालय ब्रम्हपुरी येथे दिनांक ३ जुलै





२०२६ रोज शुक्रवारला स्वर्गीय किसनलालजी भैय्या फाउंडेशन ब्रह्मपुरी तर्फे इयत्ता पाचवीच्या सुमारे १९० विद्यार्थिनींना शालेय गणवेश वितरण करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव व प्रथम नगराध्यक्ष अशोक भैय्या, संस्थेचे सदस्य सुभाषजी बजाज, संस्थेच्या सदस्या व एलएमबी पब्लिक स्कूलच्या संचालिका अशीता भैय्या मॅडम, मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम, उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम, दलाल मॅडम, हटवार मॅडम, शेंडे मॅडम मंचावर उपस्थित होत्या. कार्यक्रमांची सुरुवात प्रतिमांचे पूजन व दीप प्रज्वलनाने झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम यांनी केले. तर मुख्य अतिथी सुभाषजी बजाज, आशिता भैय्या मॅडम यांनी विद्यार्थिनींना संस्थेचे कार्य व विद्यार्थिनींना प्रेरणात्मक मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात अशोक भैया यांनी विद्यार्थिनींना गणवेशाचे महत्त्व आणि भविष्यात तंत्रज्ञानाचा वापर कसा करायचा या संबंधाने मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन ठेंगरे सर व आभार प्रदर्शन भुरे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सर्व शिक्षक शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

ब्रम्हपुरी समाचार अंक नियमित वाचनाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या वेबसाईटवर लॉगीन करा...

# ट्विंकल इंग्लिश स्कुलचा २५ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न




नागभीड/प्रतिनिधी

समिधा सेवा संस्था संचालित श्रीमती रामप्यारीदेवी आसारामजी काबरा ट्विंकल इंग्लिश स्कूल, नागभीड येथे शाळेचा २५ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात व दिमाखदार वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, शिक्षक व मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून नगरपरिषद नागभीडच्या मुख्याधिकारी सोनम देशमुख उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष गणेश तर्वेकर होते. याप्रसंगी संस्थेचे सचिव अजय काबरा, अमित देशमुख, प्रवीण बंडावार, डॉ. पवन नागरे, शाळेच्या प्राचार्या शुभांगी पोहेकर तसेच मुख्याध्यापिका संगीता नारनवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. यानंतर वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शैलेश भुरसे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. साईनाथ मस्के यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. २५ वर्षांच्या यशस्वी शैक्षणिक प्रवासाचा हा वर्धापन दिन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# महावितरण कंपनीकडून चंद्रपुर जिल्ह्यातही स्मार्ट मीटरची सक्ती

## ४८ तासांच्या अल्टिमेटममुळे ग्राहकांमध्ये भीती, भारतीय कम्युनिस्ट पार्टीतर्फे निषेध

ब्रम्हपुरी/का.प्र.

नाशिक पाठोपाठ आता चंद्रपूर जिल्ह्यातही महावितरणकडून वीज ग्राहकांना 'स्मार्ट मीटर' लावण्याबाबतचे व्हाट्सअप संदेश धडाधड येण्यास सुरुवात झाली आहे. 'हा संदेश मिळाल्यापासून ४८ तासांनंतर तुमचे सध्याचे मीटर बदलून 'स्मार्ट मीटर' बसविण्यात येईल', अशा थेट इशाऱ्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील वीज ग्राहकांमध्ये तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

काही दिवसांपूर्वी ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती व लहान व्यावसायिक ग्राहकांना स्मार्ट मीटरची सक्ती नाही, त्यांची 'प्रिपेड' ऐवजी 'पोस्टपेड' व्यवस्था पूर्ववत सुरू राहील', असे संकेत देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात महावितरण कंपनी जुन्याच परिपत्रकांचा आणि केंद्र सरकारच्या २१ ऑगस्ट २०२१ च्या राजपत्र अधिसूचनेचा संदर्भ देऊन ग्राहकांना ४८ तासांची पूर्वसूचना पाठवत आहे. या संदेशामुळे सामान्य, गरीब आणि मध्यमवर्गीय ग्राहकांवर थेट दडपशाही केली जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यातील ग्राहकांच्या मोबाईलवर येणाऱ्या संदेशात म्हटले आहे की, जर तुमचे मीटर 'स्मार्ट मीटर' नसेल



तर ते ४८ तासांत बदलले जाईल. महावितरणने यात मानवी हस्तक्षेपाशिवाय अचूक बिलिंग, मोबाईल ॲपद्वारे नियंत्रण आणि सौरऊर्जेच्या वेळेत ८५ पैशांची सवलत अशी प्रलोभने दिली आहेत. तसेच ही प्रक्रिया पूर्णपणे मोफत असल्याचे म्हटले आहे. मात्र, प्रत्यक्षात हे मीटर वेगाने फिरत असून गरिबांना आधीच नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे, अशी भीती नागरिकांमध्ये आहे.

स्मार्ट मीटरच्या या सक्तीविरोधात सध्या मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका प्रलंबित आहे. ग्राहकांच्या संमतीशिवाय मीटर बसवणे बेकायदेशीर असल्याचे बोलले जात आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक सजग ग्राहकांनी 'आम्हाला स्मार्ट मीटर नको' अशी लेखी पत्रे स्थानिक महावितरण कार्यालयात देण्यास सुरवात केली आहे.

महावितरणने या सक्तीबाबत आणि भीतीदायक संदेशांबाबत आपली भूमिका त्वरित स्पष्ट न केल्यास, जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटना आणि राजकीय पक्षांच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सहसचिव कॉम्रेड विनोद झोडगे पाटील यांनी दिला आहे.

# शेती कामासाठी माती, मुरूमावरील रॉयल्टी रद्द

## प्रा. प्रकाश बगमारेंकडून शासनाचे आभार व अभिनंदन

ब्रह्मपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्यातील अनेक शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांनी घेतला आहे. यामध्ये शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळालेला आहे. कारण शेतकऱ्यांच्या शेतीच्या कामासाठी लागणारा गाळ, माती, मुरूम यासारख्या गौण खनिजावरील रॉयल्टी रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे .महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी गुरुवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात ही घोषणा केली.

त्यानुसार शेतकरी स्वत:च्या शेतीतील कामासाठी मुरूम, माती, गाळ यांचा वापर वैयक्तिक आणि शेतीपुरता मर्यादित वापरासाठी वापरू शकतो. यासाठी शेतकऱ्यांना केवळ महसूल मंडळ अधिकाऱ्याकडे अर्ज करावा लागणार असून पंधरा दिवसाच्या आत शेतकऱ्यांना परवानगी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. संबंधित तलाव, नाला याबाबत आवश्यक त्या विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल. याशिवाय स्वत:च्या वापरासाठी माती किंवा मुरूम वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्याचे ट्रॅक्टर, ट्रक किंवा बैलगाडी अडवून कोणत्याही महसूल अधिकाऱ्याला कारवाई करता येणार नाही. जर अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना त्रास दिला तर त्या अधिकाऱ्यावर कठोर कारवाई केल्या जाईल, असा इशारा देखील महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिला.

हा निर्णय केवळ शेतकऱ्यांच्या शेती विकासासाठी आणि वैयक्तिक वापरासाठी आहे. हा अतिशय महत्त्वाचा शेतकऱ्यांच्या उपयोगी निर्णय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतल्यामुळे राज्य सरकारचे व त्यांचे समस्त शेतकरी बांधवांच्या वतीने प्रा. प्रकाश बगमारे, प्रदेश सचिव, भाजपा ओबीसी मोर्चा स्वागत करून त्यांचे अभिनंदन केले आहे.

# ने.हि. महाविद्यालयात एनसीसी प्रमाणपत्र वितरण

## माजी एनसीसी कॅडेटचा सत्कार सोहळा संपन्न

ब्रह्मपुरी/का.प्र.

स्थानिक नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथे २० महाराष्ट्र बटालियन एनसीसी, नागपूरच्या एनसीसी



विभागाद्वारे 'बी' आणि 'सी' प्रमाणपत्र वितरण तसेच माजी कॅडेट्सच्या सत्कार सोहळ्याचे अतिशय दिमाखदार आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकार होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून मेजर विनोद नरड, ने. हि. ज्युनियर कॉलेजचे पर्यवेक्षक प्रा. आनंद भोयर तसेच डॉ. प्रा. राहुल मोहुर्ले उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान मान्यवर अतिथींनी उपस्थित सर्व कॅडेट्सना मार्गदर्शन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला २० महाराष्ट्र बटालियन एनसीसी, नागपूरचे एनसीसी अधिकारी कॅप्टन अभिजित परकरवार यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात बटालियनच्या विविध उपक्रमांवर आणि एनसीसीच्या महत्त्व व यशावर प्रकाश टाकला. त्यांनी कठोर परिश्रम घेऊन प्रमाणपत्र प्राप्त करणाऱ्या कॅडेट्सचे कौतुक केले. या विशेष सोहळ्यात महाविद्यालयाचे गुणवंत माजी कॅडेट मयूर जीवन बोरकर आणि कुणाल अंकुश नेवारे यांचा त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मान्यवर अतिथींच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. यासोबतच २० महाराष्ट्र बटालियन एनसीसी अंतर्गत 'बी' आणि 'सी' प्रमाणपत्र परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झालेल्या कॅडेट्सना अतिथींच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकार यांनी, एनसीसी २० महाराष्ट्र बटालियनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण आणि राष्ट्रप्रेमाची भावना अतिशय चांगल्या प्रकारे रुजवली जात आहे, असे संबोधित केले.

कार्यक्रमाचे यशस्वी संचालन केअरटेकर ऑफिसर प्रा. रेवनदास बोरकर यांनी अत्यंत उत्साही वातावरणात केले. कार्यक्रमाच्या सांगतेप्रसंगी कॅडेट प्रिया राऊत हिने उपस्थित सर्व अतिथी, अधिकारी आणि कॅडेट्सचे आभार मानले. या प्रसंगी प्राध्यापक आणि कॅडेट्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत काशिबा महाराज गुरव समाज संस्थेकडून गुणवंतांचा सत्कार



ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक ०५ जुलै २०२६ रविवार ला सत्र २०२५-२०२६ मध्ये उत्तीर्ण झालेल्या वर्ग पहिली ते बारावी पर्यंत च्या गुरव समाजातील पाल्यांचा अभिनंदन व गौरव सत्कार कार्यक्रम लोकमान्य टिळक वाचनालय येथे संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सचिन थारकर होते. प्रमुख अतिथी म्हणून रंजन कस्तुरकर, सचिव सचिन भैरव, कोषाध्यक्ष शशिकांत माडे, महिला प्रतिनिधी सुनीता राणे प्रामुख्याने उपस्थित होते. प्रसंगी गुणवंतांना प्रशस्तीपत्र, भेटवस्तू आणि शिल्ड देऊन अभिनंदन आणि गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन सुचित्रा कहारे यांनी केले तर आभार प्रदर्शन सचिव सचिन भैरव यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता सुरेशजी हेजीब, शिवा कस्तुरकर, संदीप शिवणकर, रोहित त्रिंबके, नितीन थारकर, स्वप्निल थारकर, शुभम राणे, अनिल भावडकर, संकेत हेजीब, सुजाता शिवणकर, अंजली त्रिंबके, वसुधा चने, सविता हेजीब, सरिता भैरव, दुर्गा माडे, वैशाली घावनकर, स्वाती शिवणकर, रोशनी थारकर या सर्वांनी अथक परिश्रम घेतले.

# नेवजाबाई हितकारिणी विद्यालयात गणवेश वितरण सोहळा





ब्रह्मपुरी/का.प्र.

स्व. किसनलालजी भैया फाऊंडेशन तर्फे दिनांक ५ जुलै २०२६ रोजी ब्रह्मपुरी येथील नेवजाबाई हितकारणी उच्च माध्यमिक विद्यालय ब्रह्मपुरी येथे इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना गणवेश वितरण करण्यात आले.

गेल्या पंचावीस वर्षापासून स्व. किसनलालजी भैया फाउंडेशन अंतर्गत विद्यार्थ्यांना शाळेच्या सुरुवातीस गणवेश वितरण करण्यात येते. यावर्षी सुद्धा हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. वरील प्रसंगी संस्थेचे सचिव अशोकजी भैया तसेच संस्थेचे कोषाध्यक्ष बजाज साहेब, ने .ही.विद्यालयचे मुख्याध्यापक नाईक सर, उपमुख्याध्यापक नाकाडे सर, पर्यवेक्षक जीभकाटे सर, तसेच शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंद व इयत्ता पाचवी चे विद्यार्थी उपस्थित होते.

संस्थेचे सचिव अशोक भैया यांच्या हस्ते गणवेश वितरण कार्यक्रम पार पाडण्यात आला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या भावी शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्यो. वरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किसान सर व आभार प्रदर्शन बोरकर सर यांनी केले.

# ब्रम्हपुरीत 'FISCPCON 26' राष्ट्रीय...

(पान क्र. १ वरून)

यशस्वी आयोजनासाठी डॉ. लाडुकर यांना मनापासून शुभेच्छा दिल्या.

ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार अतुल देशकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना ब्रम्हपुरीतील वैद्यकीय क्षेत्राच्या झालेल्या अभूतपूर्व प्रगतीची मीमांसा केली. तसेच, येथील सर्वसामान्य व गरजू रुग्णांना परवडणाऱ्या आरोग्य सुविधा मिळवून देण्यात डॉ. लाडुकर यांचे योगदान मोठे असल्याचे सांगितले.

ब्रम्हपुरीचे प्रथम नगराध्यक्ष अशोकजी भैय्या यांनी एवढ्या मोठ्या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल डॉ. लाडुकर आणि त्यांच्या संपूर्ण चमूचे जाहीर कौतुक केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच ब्रम्हपुरी नगरपालिकेचे नगराध्यक्ष योगेश मिसार आणि मुख्याधिकारी माधुरी सलामे यांनीही आपल्या मनोगतातून या परिषदेच्या भव्य आयोजनाची प्रशंसा केली. 'ANS' च्या अध्यक्षा डॉ. कु. जहागीरदार यांनी मानवी शरीरातील गुंतागुंत आणि चयापचय संस्थेवरील परिणामांवर प्रकाश टाकला, तर 'ISCP' चे सेक्रेटरी डॉ. नीरज गोयल यांनी असोसिएशनच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे मुद्देसूद विश्लेषण केले.

या संपूर्ण सोहळ्याचे अत्यंत बहारदार आणि नेटके सूत्रसंचालन डॉ. तरल नागमोती व डॉ. स्नेहा पर्वते यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. पर्वते यांनी मानले. एकंदरीत, 'FISCPCON 26' च्या माध्यमातून डॉ. लक्ष्मीकांत लाडुकर आणि लाडुकर सर्जिकल हॉस्पिटलने घेतलेली झेप ही ब्रम्हपुरी परिसरासाठी भूषणावह असून, त्यांच्या या मानवतावादी कार्यावर संपूर्ण तालुक्यातून स्तुतीसुमनांचा वर्षाव होत आहे.

# धानाचे पोते भरलेली ट्रॅक्टर ट्रॉली उलटली

## अऱ्हेरनवरगांव-ब्रम्हपुरी मार्गाची दुरावस्था कारणीभूत



ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील अऱ्हेरनवरगाव ते ब्रह्मपुरी रस्त्याची दयनीय अवस्था या बातमीत रस्त्यावरती मोठा अपघात होण्याची शक्यता वर्तविण्यात आली होती. त्याचीच प्रचिती लगातार तीन दिवस दिसून आली आहे. दिनांक ५/७ /२६ शनिवारला सकाळच्या सुमारास विद्यार्थ्यांना ब्रह्मपुरी येथे घेऊन जाणारी स्कूल बस चिखलमय रस्त्यामुळे मुख्य रस्ता सोडून रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी खाणार तोच ड्रायव्हरच्या सतर्कतेने पलटी खाता खाता राहिली. स्कूलबस पलटी झाली असती तर होत्याचे नव्हते झाले असते.

काल दुपारच्या सुमारास धानाचे पोते भरलेले ट्रॅक्टर खड्डेमय रस्त्यामुळे ट्रॅक्टर ट्रॉली पलटी वाचला. तसेच दोन मोटार सायकलची समोरासमोर धडक होऊन त्यात प्रतीक वकेकार याच्या पायाला जबर दुखापत झाली त्याच्या पायाची हड्डी मोडल्याचे बोलल्या जात आहे सध्या तो कापगते हॉस्पिटल ब्रह्मपुरी येथे उपचार करीत आहे. प्रतिक आपल्या वडिलाला ब्रह्मपुरी रेल्वे स्टेशन वरती सोडून अरे नवरगाव ला परत येत असतांना विरुद्ध दिशेने येणाऱ्या मोटरसायकल सोबत आमने-सामने टक्कर झाली.

पावसाळ्याच्या सिझनमध्ये सुरू असलेल्या या अपघाताच्या मालिकेमुळे संबंधित रस्ता बांधकाम विभागाने, लोकप्रतिनिधीने लक्ष देऊन रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम हाती घ्यावे व या रस्त्याने ये जा करणाऱ्या विद्यार्थी, वाहनधारक आणि नागरिकांना प्रवासासाठी योग्य रस्त्याची सोय उपलब्ध करून द्यावी, अन्यथा रस्ता रोको सारखे जनआंदोलनाचे शस्त्र हाती घ्यावे लागेल, असा इशारा परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

### ... QUOTES ...

**"I suppose leadership at one time meant muscles; but today it means getting along with people."**

**- Mahatma Gandhi**

### चा रो ळी

*आम्ही देशाला लुटतो*
*तुम्ही परस्परांना लुटा...*
*आम्ही 'जेब भरो' करतो,*
*तुम्ही 'जेल भरो' करा...*

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# ॲड. बिहारी कांबळे यांच्या जन्मशताब्दी दिनी गुणवंतांचा सत्कार

ब्रह्मपुरी/का.प्र.

'समाजातील गरिबांना उन्नत आणि प्रगती करायची असेल तर शिक्षणाशिवाय तरनोपाय नाही. शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे साधन आहे. हे हेरून ॲड. बिहारी कांबळे यांनी नान्होरी सारख्या खेड्यात गरिबांसाठी १९६० ला शिक्षणाचे दरवाजे खुले केले', असे प्रतिपादन प्रवीण खोब्रागडे यांनी केले. ते बिहारी कांबळे यांच्या जन्मशताब्दी सोहळयात उद्घाटक म्हणून बोलत होते.

ब्रह्मपुरी तालुक्यातील नान्होरी येथे दिनांक २जुलै २०२६ला सिद्धार्थ विद्यालय नान्होरीचे संस्थापक ॲड. बिहारी रामजी कांबळे यांच्या जन्मशताब्दी सोहळयाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. आनंद बिहारी कांबळे, उद्घाटक अ.भा. रिपब्लिकन पक्ष चे अध्यक्ष प्रवीण उर्फ बाळू खोब्रागडे चंद्रपूर, तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य डॉ. सिद्धार्थ मेश्राम नांदुरा, प्रा. सुजाता बुंदेले, प्राचार्य डॉ. देवेश कांबळे, रिपब्लिकन पक्षाचे नेते अशोक निमगडे चंद्रपूर, ज्येष्ठ पत्रकार नेताजी मेश्राम, जीवन बागडे, प्राचार्य डॉ. राजेश कांबळे, माजी मुख्याध्यापक एस एस नगराळे, माजी मुख्याध्यापिका श्रीमती मंगर, ममता अजय कांबळे, प्रा. मुकेश रामटेके, डॉ .मिलिंद रंगारी, रितिक संजय कांबळे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी एड्. बिहारी कांबळे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी सिद्धार्थ विद्यालय नान्होरी येथील गुणवंत विद्यार्थी साहील बबन कोलते, कु.वेदांती मिसार, कु.मंजु देशमुख, कु.अक्षरा मेश्राम व विद्यालयाचे नावलौकीक करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा, माजी मुख्याध्यापकांचा आणि ॲड. बिहारी कांबळे यांच्या आप्तेष्टांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन इंजिनियर संजय कांबळे, ममता अजय कांबळे आणि सिध्दार्थ विद्यालयाचे वतीने आयोजन केले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अर्चना नाईक शिक्षिका, प्रास्ताविक मुख्याध्यापक भोजराज खोब्रागडे तर आभार प्रदर्शन अभिनीत गेडाम यांनी केले.

# एलएमबी स्कुलमध्ये शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

ब्रम्हपुरी/का.प्र.

मंगळवार, दि. ३० जुन २०२६ ला एल. एम. बी. पब्लिक स्कुल मध्ये शाळेचा प्रथम दिवस





साजरा करण्यात आला. दोन महिनाच्या उन्हाळाच्या सुट्टया संपून ३० जुन रोज मंगळवार ला विद्यार्थ्यांनी हसत खेळत आनंदात शाळेत प्रवेश घेतला. तसेच १ जुलै २०२६ रोज बुधवारला प्री-प्रायमरीच्या विद्यार्थ्यांनी हसत खेळत आनंदात शाळेत प्रवेश घेतला.

मुलांचे स्वागत करतांना त्यांना भेटवस्तु सुद्धा देण्यात




आल्या. शाळेच्या पहिल्या दिवशी मित्र मंडळी भेटल्यामुळे विद्यार्थ्यांचा आनंद व्दिगुणीत झाला होता. दोन महिने शांत असलेला शालेय परिसर विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने गजबजून गेला. पहिल्या दिवशी वर्गात पुन्हा एकदा मुलांच्या हसण्याचा, गप्पांचा आणि उत्साहाचा किलबिलाट सुरू झाला. नव्या स्वप्नांसह नव्या आशांसह ह्या शैक्षणिक वर्षाची सुरूवात झाली आहे. सर्व शिक्षक वृदांनी अतिशय सुबकतेने शाळेचे सुशोभिकरण केले होते. विद्यार्थ्यांना अभ्यासाची आवड निर्माण करण्यासाठी नविन सुशोभित वर्ग, नवनवीन स्मार्ट टिव्ही लावण्यात आले. शाळेतील बदल बघून मुले त्यात हरवून गेले व त्यांच्यात एक नवीन उत्साह दिसून आला.

यावेळी मुलांच्या स्वागतासाठी शाळेचे मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका मॅडम, पर्यवेक्षिका मॅडम, शिक्षकवृंद तसेच शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम उपस्थित होत्या. त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक करत त्यांचे स्वागत केले. तसेच त्यांच्या उज्वल भविष्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.

✽✽✽✽✽✽


Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.


# ने.हि. कन्या विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव



ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक ३० जून २०२६ रोज मंगळवारला नेवजाबाई हितकारणी कन्या विद्यालय ब्रह्मपुरी येथे शाळेचा पहिला दिवस ‘शाळा प्रवेशोत्सव’ कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका बनपुरकर मॅडम, प्रमुख पाहुणे शाळेचे उप मुख्याध्यापक निखारे सर, शाळेच्या पर्यवेक्षिका खंडाते मॅडम, ज्येष्ठ शिक्षिका दलाल मॅडम, हटवार मॅडम, शेंडे मॅडम, तसेच पालक प्रतिनिधी ओमकार ठाकरे, माता पालक प्रतिनिधी प्रियंका उईके मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात द्वीप प्रज्वलन व मान्यवरांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून झाली. या कार्यक्रमात भोसला मिलिटरी स्कूल व साई खेलो इंडिया सेंटर नाशिक तर्फे आयोजित ४०० मीटर रनिंग स्पर्धेत कुमारी मानसी शिखर फटिंग या विद्यार्थिनीची प्रथम क्रमांक आल्याबद्दल व तिची भोसला मिलिटरी स्कूल येथे निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते शिल्ड व मेडल देऊन तिचा सत्कार करण्यात आला. तसेच श्वेता विष्णू पिलारे हिने सुद्धा ३०० मीटर रनिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला त्याबद्दल या विद्यार्थिनीचे सुद्धा मेडल देऊन सत्कार करण्यात आला. नंतर मान्यवरांच्या हस्ते इ.५ते ८ विद्यार्थिनींना पुस्तकाचं वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उंदीरवाडे मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन भुरे मॅडम यांनी केले. याप्रसंगी शाळेचे समस्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्य पालक वर्ग उपस्थित होता.


N.B.H.Education Society's

SHANTABAI BHAIYA MAHILA MAHAVIDYALAYA

BRAMHAPURI, DISTT. CHANDRAPUR (M.S.)

**Walk-in-Interview for CHB Teachers of UG Level**

(No Grant Basis) for Session 2026-2027)

**Attend the Walk-in-interview for CHB along with Marklists, Certificates and relevant documents.**

| Subject | No.of Posts | Date of Interview | Subject | No.of Posts | Date of Interview |
|---|---|---|---|---|---|
| Physics | 04 | Dt. 09/07/2026 at 11.00 am | Marathi | 02 | Dt. 09/07/2026 at 11.00 am |
| Mathematics | 01 | | English | 02 | |
| Chemistry | 04 | | Economics | 02 | |
| Zoology | 04 | | History | 02 | |
| Botany | 02 | | Sociology | 02 | |
| | | | Physical Education | 02 | |
| | | | Home Economics | 03 | |
| | | | Political Science | 02 | |
| | | | Geography | 02 | |

ADMISSION OPEN

- B.Sc. I, II, III (Physics, Chemistry, Maths, Zoology, Botany)
- B.A. I, II, III (ELT, MLT, Geography, Home Economics, Pol.Science, Economics & Sociology)

Shri. Ashok K. Bhaiya, Secretary | Smt. Snehalatabai K. Bhaiya, President | Dr. M.S. Warbhe, Principal



Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404